RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष १२, अंक ३७]** **मंगळवार, ऑगस्ट ११, २०२६/श्रावण २०, शके १९४८** **[पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००**

**असाधारण क्रमांक ८१**

### प्राधिकृत प्रकाशन

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमांन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून
### नगरपरिषद प्रशासन शाखा

**संदर्भः** (१) तपासणी अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडील पत्र जावक ठामपा/निवडणूक/खवहितप-जा-३३७- A, दिनांक ०५/०६/२०२६.

(२) राज्य निवडणूक आयोग आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४.

(३) या कार्यालयात झालेली सुनावणी दिनांक २९/०६/२०२६ व दिनांक ०६/०८/२०२६

**आदेश**

क्रमांक नपप्र२-कार्या/अनर्ह करण्याबाबत २०२६-२७/८४०.— ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक, २०२६ करिता एकूण ६४८ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व कायदेशीर तरतुदींनुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने विहित मुदतीत आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, संदर्भ क्र. १ मधील आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार, खालील नमूद २४ उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर केलेला नाही.

त्यामुळे संदर्भ क्रमांक २ येथील राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, सदर उमेदवारांना अनर्ह घोषित करण्यासाठीचा नमुना सहा मधील प्रस्ताव ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडून या कार्यालयास सादर करण्यात आला होता.

सदर उमेदवारांना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार आपली बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी या कार्यालयात दिनांक २९/०६/२०२६ व दिनांक ०६/०८/२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान काही उमेदवार उपस्थित तथा काही उमेदवार हे अनुपस्थित राहिले. तथापि सदर उमेदवार यांनी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळेत खर्चाचा हिशोब सादर केलेला नाही परिणामी, सदर उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कायदेशीर आदेशांचे व तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मी, **विभागीय आयुक्त, कोकण विभाग,** मला राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/ संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १० (१ई) नुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये निवडणूक लढवूनही विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्याबद्दल, खालील तक्त्यात नमूद **उमेदवाराना पुढील ३ (तीन) वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यास व महानगरपालिका सदस्य होण्यास "अनर्ह " घोषित करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रभाग क्रमांक | पक्षाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | उंबरसाडे हेमंत रामा | १ अ | नॅशनल काँग्रेस पार्टी |
| २ | रोहिणी दिपक ठाकूर | १ ब | अपक्ष |
| ३ | किशोर अण्णासाहेब ढोबळे | २ ड | अपक्ष |
| ४ | अविका अविनाश जाधव | २ ब | वंचित बहूजन आघाडी |
| ५ | सिता शालिकराम चांदणे | ३ अ | अपक्ष |
| ६ | बबीता आशिष सिंग | ३ क | समाजवादी पार्टी |
| ७ | अमर अशोक अठवले | ३ ड | अपक्ष |
| ८ | मंजुळा शंकर माळेकर | ४ ब | अपक्ष |
| ९ | रचना वैदय | ४ क | अपक्ष |
| १० | बीपीन सिंह | ७ क | आम आदमी पार्टी |
| ११ | योगिता नामदेव गजभिये | ६ अ | वंचित बहुजन आघाडी |
| १२ | भोसले सागर पांडूरंग | ६ क | अपक्ष |
| १३ | साळवी अमोल अनिलकुमार | ६ क | अपक्ष |
| १४ | पवन एकनाथ पडवळ | १५ अ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १५ | शिंदे रविंद्र चांगो | १५ अ | अपक्ष |
| १६ | केवळादेवी रामनयन यादव | १५ क | बहुजन समाज पार्टी |
| १७ | राघु एकनाथ भोसले | ९ ड | वंचित बहुजन आघाडी |
| १८ | यशोदा प्रशांत गायकवाड | २४ अ | अपक्ष |
| १९ | हर्षल जयहिंद कोळी | २४ ड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २० | पुष्पा सचिन कदम | २५ ब | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २१ | अमीर नईम खान | २५ ड | ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन |
| २२ | निशात खान | २९ ब | अपक्ष |
| २३ | अन्सारी अब्दूल फहीम | २९ क | ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन |
| २४ | वैकुंठ कान्हा म्हात्रे | २९ क | अपक्ष |

सदर अनर्हतेचा कालावधी हा आदेश जारी झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

कोकण विभाग,
दिनांक १० ऑगस्ट २०२६.

**रुबल अग्रवाल** ( भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.